प्रकरण चौथे

# 'महात्मा' मधील व्यक्तिरेखा

प्रकरण चौथे :

# महात्मा मधील व्यक्तिरेखा

## ४.१ प्रास्ताविक :

मागील दुसऱ्या प्रकरणामध्ये आपण 'महात्मा' मधील कथानकाचा विचार केला. आता ह्या तिसऱ्या प्रकरणामध्ये आपण 'महात्मा' ह्या कादंबरीतील व्यक्तिरेखांचा विचार करणार आहोत.

व्यक्तिरेखांमुळे कादंबरीतील कथानकास अर्थ प्राप्त होत असतो. शिवाय कादंबरीतील घटनांचे आकर्षण वाढत असते. कादंबरी लिहीत असताना कादंबरीकाराच्या पुढे प्रथम व्यक्तिरेखा असतात. त्यानुसार कथानकाची जुळणी तो करीत असतो. कादंबरीतील व्यक्तिरेखा जितक्या विकसनशील व जिवंत असतील, तितके जीवनदर्शन वास्तवपूर्ण होत असते. वास्तववादी कादंबरीकार हा आपल्या व्यक्तिरेखांशी तटस्थतेचे नाते बाळगून असतो. त्या व्यक्तिरेखांच्या भावना, आकांक्षा, त्यांची वृत्तीप्रवृत्ती ह्यांच्याशी समरस होऊन तो त्या रेखाटत असतो. म्हणून कादंबरीतील एक महत्त्वाचा घटक म्हणजे व्यक्तिरेखा हा होय. ह्या घटकामुळे कादंबरीच्या यशात भर पडत असते. कादंबरीकार मानवी जीवनातील वास्तव आपल्या कादंबरीतून मांडत असतो. ते मांडत असताना त्याला व्यक्तिरेखांचे साहाय्य घ्यावे लागते. कादंबरीत जी व्यक्तिरेखा त्याने साकारलेली असते, ती त्या व्यक्तीच्या स्वभावाचे, वागण्याचे आकलन करूनच. कादंबरीतील व्यक्तिरेखा जर काल्पनिक असतील, तर त्यांच्यात जिवंतपणा येण्यासाठी त्या व्यक्तिरेखांचा स्वभाव, त्यांचे वागणे ह्यातून त्या व्यक्तिरेखांचे जीवन साकार व्हावे लागते. निवेदन व संवाद ह्यांच्या माध्यमातून कादंबरीकार कादंबरीत व्यक्तिदर्शन घडवत असतो. हे व्यक्तिदर्शन विशिष्ट गुणधर्मांचे प्रतीक नसते, तर सभोवती वावरत असलेल्या माणसांच्या स्वभावाचा

प्रतिनिधिक परिचय करून देणारे ते असते. ह्याबाबत बापट-गोडबोले म्हणतात, ''कादंबरीतील पात्रे काल्पनिक खरी. पण त्यांच्यात जिवंतपणा येण्यासाठी त्यांना देव किंवा दानव कोटीतील करण्याऐवजी मानवकोटीतील करणेच जरूर आहे.''[१]

जर कादंबरी एखाद्या व्यक्तीच्या जीवनावर आधारलेली असेल, म्हणजेच ती चरित्रात्मक कादंबरी असेल, तर कादंबरीकारासमोर मोठे आव्हानच असते. त्याला आधी ती व्यक्ती पूर्णपणे जाणून घ्यावी लागते. तसेच त्या व्यक्तीचा थोडासा तरी पूर्वपरिचय वाचकांना असतो. परंतु आणखी काही वाचण्याची, जाणून घेण्याची इच्छा प्रत्येकाला असते. म्हणूनच वाचक त्या कादंबरीकडे वळत असतो. चरित्रात्मक कादंबरी लिहिणारा लेखक हा कादंबरीकारही असतो व इतिहासकारही असतो. तेव्हा त्याला प्रतिभाशक्तीबरोबरच पुराव्यांचाही आधार घ्यावा लागतो. एखादी व्यक्ती कादंबरीत उभी करीत असताना त्या व्यक्तीच्या मनात काय भावना होत्या, ह्याचे वर्णन करताना त्याला पुराव्यांबरोबरच प्रतिभाशक्तीचाही आधार घ्यावा लागतो. रवींद्र ठाकूर ह्यांची 'महात्मा' ही वास्तवतेच्या आधारावर उभारलेली, पण कल्पनेची झालर असलेली एक चरित्रात्मक कादंबरी आहे. सामाजिक जीवनाचेही चित्रण तिच्यात आहे. ह्या कादंबरीत अनेक तऱ्हेच्या स्वभावाच्या व्यक्ती आहेत. त्यांची संख्या जवळजवळ १८९ आहे. ह्या व्यक्तिरेखांचे खालील प्रकार वर्गीकरण करता येईल :

१. दोन प्रमुख व्यक्तिरेखा.

{ (अ) म. फुले ऊर्फ तात्या व (आ) सावित्रीबाई फुले ऊर्फ काकू }

२. तात्यांचे आप्तस्वकीय.

३. तात्यांचे मित्र / सहकारी.

४. अन्य पुरुष व्यक्तिरेखा.

५. अन्य स्त्री व्यक्तिरेखा.

ह्या सर्व व्यक्तिरेखा विकसनशील असून त्या कादंबरीकाराने जिवंत उभ्या केल्या आहेत. कादंबरी वास्तवदर्शी होण्यामागे हे एक कारण आहे. ह्या सर्व व्यक्तिरेखा चित्रित करताना कादंबरीकार तटस्थ राहिलेला आढळतो. त्यांने त्या आपल्या कल्पनेने निर्माण केलेल्या नाहीत. व्यक्तिरेखांचे चित्रण करताना व तत्कालीन सामाजिक, राजकीय जीवनाचे आकलन मांडत असताना कादंबरीकाराला त्या व्यक्तिरेखा कशा होत्या, ह्याचा अभ्यास करावा लागतो. ती व्यक्ती आपल्यासमोर मांडताच त्या व्यक्तीद्वारे एकूण परिस्थिती कशी होती, ह्याचे भान आपल्याला येऊ शकते.

## ४.२ दोन प्रमुख व्यक्तिरेखा :

### (अ) म. फुले ऊर्फ तात्या :

'महात्मा' ह्या कादंबरीत ज्या वेगवेगळ्या व्यक्तिरेखा आलेल्या आहेत, त्यात सर्वाधिक प्रमुख व्यक्तिरेखा म्हणजे म. जोतीराव फुले ही होय. कादंबरीत म. फुले ह्यांना 'तात्या' म्हणूनच कादंबरीकाराने संबोधले आहे. संपूर्ण कादंबरी त्याच्याभोवतीच गुंफलेली आहे. तात्या हेच ह्या कादंबरीचे केंद्रबिंदू आहेत. सामाजिक कार्य करताना त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे दिसून आलेले विविध पैलू कादंबरीकाराने चित्रित केले आहेत. ते पुढील प्रमाणे :

#### १. ध्येयनिष्ठ व्यक्तिमत्त्व :

संतश्रेष्ठ तुकारामांनी साधुत्वाची लक्षणे सांगताना म्हटले आहे, "जे का रंजले गांजले । त्यासि म्हणजे जो आपुले । तोचि साधू ओळखावा । देव तेथेचि जाणावा ॥" साधुत्त्वाची ही लक्षणे ज्या महापुरुषाच्या जीवनकार्यात ठायीठायी प्रत्ययाला येतात, असा महापुरुष म्हणजे महात्मा फुले ऊर्फ तात्या. तात्यांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे त्यांनी कोणतेही कार्य करावयाचे मनात आणले, तर ते काम ते पूर्णच करीत असत. त्यासाठी कोणतेही संकट आले, तरी त्याला ते तोंड देत असत.

आपल्या ध्येयाकडेच त्यांचे लक्ष असे. बालपणापासूनच टॉमस पेन, अॅब्राहम लिंकन, शिवछत्रपती, फादर जेम्स ह्यांचा प्रभाव त्यांच्यावर पडलेला होता. आपल्या भारत देशात आलेल्या इंग्रजांविरुध्द लढायचे, असे प्रथम त्यांना व त्यांच्या मित्रांना वाटत होते. परंतु त्यांच्या एका मित्राच्या लग्नात झालेल्या त्यांच्या अपमानामुळे त्यांचा निर्णय बदलतो. ते पूर्णपणे टॉमस पेनच्या विचाराकडे आकर्षित होतात, त्यांना जीवित कार्याची दिशा सापडते. मानवी प्रतिष्ठा, व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार आणि गुलामगिरीचा सर्वंकष निषेध ह्या पेनच्या विचारांनी ते झपाटून जातात. राजकीय गुलामगिरी नष्ट करून पुन्हा तेच अन्यायकारक पेशव्यांचे राज्य आणण्यापेक्षा त्यांना व्यक्तिस्वातंत्र्य महत्त्वाचे वाटू लागते. व्यक्ती जर सामाजिक बंधनाने जखडलेली असेल, तर तिला राजकीय गुलामगिरी नष्ट होऊन उपयोग होणार नाही, हे ते जाणतात. त्यासाठी प्रथम सामाजिक बंधनातून व्यक्तीची मुक्तता केली पाहिजे, हे ते ठरवतात. पिढ्यानूपिढ्या तिच्यावर जी बंधने लादली गेली आहेत, त्यांच्यातून तिची मुक्तता करावयाची असेल, तर ब्रहमकूटाचा भेद केला पाहिजे. त्याशिवाय तिचा स्वाभिमान जागा होणार नाही, हे म. फुल्यांच्या लक्षात येते. पेनच्या प्रत्येक वाक्याने म. फुल्यांच्या हृदयात घर करून ठेवले होते. त्यामुळेच त्यांचे एक ध्येय बनले व त्या ध्येयाच्या प्राप्तीसाठी त्यांनी आपली वाटचाल सुरू केली. यश आता प्रथम नाही मिळाले तरी किंवा विरोध झाला तरी त्याला न जुमानता त्यांनी आपल्या ध्येयाच्या दिशेने वाटचाल चालूच ठेवली. कारण त्यांना माहीत होते की, पुढे चालून आपल्याला यश नक्कीच मिळेल. त्यांचे ध्येय, स्वप्न अखेरीस पूर्ण झाले. त्यांना शूद्रातिशूद्रांसाठी शाळा काढावयाच्या होत्या. मुलींसाठीही शाळा काढावयाच्या होत्या. त्यासाठी प्रथम त्यांनी आपल्या पत्नीलाच म्हणजे सावित्रीबाईंना शिकवण्यास सुरूवात केली. सावित्रीबाईंनी आपण शिकून

मुलींनाही शिकवण्यास सुरूवात केली, तेव्हा म. फुले व सावित्रीबाई ह्या दोघांना घर सोडावे लागले. तरी त्याची त्यांनी पर्वा केली नाही. कारण ध्येयापुढे त्यांनी इतर गोष्टींचा कधीही विचार केलेला नव्हता.

## २. स्वतंत्र विचारशक्ती :

एखादी व्यक्ती तिच्या कोणत्या तरी एखाद्याच गुणामुळे वैशिष्ट्यपूर्ण ठरत असते. परंतु अशी एखादीच व्यक्ती असते की, जी सामान्य असूनही अनेक गुणांमुळे असामान्य ठरत असते. म. फुले म्हणजे तात्या ह्यांना स्वत:चे मूल नव्हते. आजही असे अनेक नवरे आपल्याला आढळतात की, ज्यांना स्वत:च्याच रक्तामासाचे मूल हवे असते. त्यासाठी ते आपल्या पहिल्या पत्नीला मूल होत नसेल, तर दुसरे लग्न करतात. पण मूल दत्तक घ्यावे, असे काही त्यांना वाटत नाही. हे धाडस म. फुले ह्यांनी मात्र आपल्या काळी केले. ते आपले मेहुणे सदुभाऊ (सावित्रीबाईंचे बंधू) ह्यांना म्हणतात, ‘‘सदुभाऊ, एखाद्या जोडप्याला मूल होत नसेल, तर त्याचा दोष एकट्या स्त्रीकडे कसा ? एकट्या स्त्रीला वांझपणाचा दोष लावणं, हा निर्दयपणा आहे. नवऱ्यात वांझपणाचा दोष नसेल कशावरून ?’’[२] ह्यातून त्यांची स्वतंत्र विचारशक्ती दिसून येते. त्यावेळी असे विचार करणारे व्यक्तिमत्त्व आढळणे कठीणच होते. तात्यांच्या दुसऱ्या लग्नाविषयी घरात बोलणी चालू असताना तात्यांनी समस्त स्त्रीजातीचा विचार केलेला आहे. त्यावेळी त्यांच्यापुढे फक्त सावित्रीच नव्हती, तर समस्त स्त्रीच्या व्यथेची त्यांना जाणीव होती. म्हणून ते आपल्या दुसऱ्या लग्नास विरोध करताना म्हणतात, ‘‘मूल नसलेल्या जोडप्याला स्त्रीनं मी दुसरा नवरा करणार आहे, असं म्हटलं, तर तिच्या नवऱ्याला काय वाटेल ? त्याला तो अपमान वाटणार नाही का ? त्याचप्रमाणे पुरुषानंही दुसऱ्या लग्नाचा विचार करताना पत्नीला काय वाटेल, याचा विचार करायला नको

का ?''[३] दुसऱ्या लग्नाची परवानगी स्त्रीलाही असावी, अशीच त्यांची त्यामागची धारणा होती. त्यांनी स्वतःच्या दुसऱ्या लग्नास पूर्णपणे विरोध केला होता. त्यांनी आपल्या समाजकार्यात स्त्रीच्या उन्नतीला अग्रस्थान दिले होते. मग ती स्त्री कशीही असो, त्यांना स्त्रीजातीचा उध्दार करावयाचा होता. त्यातच काशीबाई हीस भ्रूणहत्येच्या खटल्यामुळे जन्मठेपेची शिक्षा झाली होती. त्यामुळे ते जास्तच विचारमग्न झाले होते. स्त्री ही समाजाच्या वरवंट्याखाली भरडली जात आहे आणि हे थांबविण्यासाठी त्यांनी पुणे शहरात 'काळे पाणी टाळण्याचा उपाय' ही जाहिरात प्रत्येक मोक्याच्या ठिकाणी लावून सनातन्यांची झोप उडविली होती व विधवांच्या आयुष्याचा प्रश्न सोडविला होता. ह्या त्यांच्या कार्यामधून त्यांची स्वतःची एक स्वतंत्र विचारशक्तीच दिसून येते.

**३. कार्यतत्परता :**

मनात आणलेले विचार म. फुले प्रत्यक्षात आणत असत. त्यासाठी ते कोणतेही प्रहार स्वतःवर घेण्यास तयार असत. त्यामुळे त्यांच्यावर अनेक प्राणघातक प्रसंग ओढवले. त्यांच्या कार्यात विघ्न आणणाऱ्या लोकांनी त्यांच्यावर मारेकरी घातले होते. परंतु त्यातीलच एक मारेकरी त्यांचा शिष्य व दुसरा मारेकरी अंगरक्षक बनला. क्रांतिकारक अशा त्यांच्या कार्यात सतत विघ्ने येत गेली, तरीही त्यांनी आपले कार्य करण्याची जिद्द कोठे डळमळू दिली नाही. त्यांनी प्रथम शिक्षणाला आपल्या कार्यात अग्रस्थान दिले. शिक्षणामुळे सामाजिक परिवर्तन होईल म्हणून प्रथम त्यांनी स्त्रीस शिक्षण द्यावे, असे ठरविले. शिक्षण सर्व समाजापर्यंत किंवा तळागाळाच्या लोकांपर्यंत पोहोचावयाचे असेल, तर प्रथम स्त्रीला शिकविले पाहिजे. त्याशिवाय ते समाजापर्यंत पोहोचू शकणार नाही, हे त्यांनी ओळखले होते. '' जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उद्धरी'', हे लक्षात घेऊन त्यांनी प्रथम

स्त्रीस शिकविण्यास सुरूवात केली, तीही आपल्या घरापासून, स्वतःची पत्नी सावित्रीबाई ह्यांच्यापासून. त्यासाठी त्यांनी घरातील लोकांचा विरोधही स्वीकारला, आपले घरही सोडले. " बोले तैसा चाले । त्याची वंदावी पाउले ।" ह्या उक्तीप्रमाणे म. फुले ऊर्फ तात्या ह्यांची कार्यतप्तरता होती.

विधवाविवाहाचा ज्या वेळेस विषय निघाला, त्यावेळेस रावसाहेबांना (न्यायमूर्ती रानडे) म. फुले ह्यांनी सुनावले, "मग रावसाहेब, आपलं हे सुधारकाचं ढोंग पुरं करा."[४] दुर्गाबाई (रावसाहेबांची बहीण) हिच्या पुनर्विवाहाविषयी तात्या बोलत होते. परंतु रावसाहेबांनी सांगितले, "समाजसुधारकांनी समाजाकडे लक्ष दिले पाहिजे." त्यावर तात्या म्हणाले, "समाजाचा विचार करणं आणि आयत्या वेळी कच खाणं या दोन्ही गोष्टी वेगळ्या आहेत. रावसाहेब ! समाजसुधारणेच्या गोष्टी बोलणाऱ्या आपल्यासारख्या लोकांनी वेळ येईल, त्याप्रमाणे सुधारणा आचरणात आणल्या, तरच आपल्या विचारांना काही अर्थ आहे. समाजमन हळूहळू बदलत जाईल त्याची एवढी काळजी कशासाठी ?"[५]

म. फुले ऊर्फ तात्या हे ध्येय समोर असताना फक्त त्यासाठीच झपाटल्याप्रमाणे एका वेगळ्याच धुंदीत राहून ते पूर्ण करीत. तत्कालीन विरोधाचा त्यांनी कधी विचार केला नाही. आयुष्यभर त्यांनी अनेक ध्येये आपल्यासमोर ठेवली होती आणि ती सर्व निर्भयपणे त्यांनी पूर्ण केली. त्यातून त्यांनी समाजजागृतीचे कार्य केले. शिक्षण क्षेत्रात सामान्य, शोषित माणसासाठी त्यांनी 'गुलामगिरी' हा ग्रंथ लिहिला. शेतकऱ्याच्या दुःस्थितीविषयी 'शेतकऱ्याचा असूड' हा ग्रंथ लिहिला, प्रस्थापित समाजाला खडबडून जागे केले ते 'तृतीय रत्न' ह्या नाटकाद्वारे. तसेच शिवाजीचा पोवाडा, शिवाजीच्या समाधीचा शोध, अस्पृश्यांसाठी तर खूपच कार्य केले. स्त्रियांसाठी त्यांनी शाळा काढल्या, बालहत्या

प्रतिबंधक गृहाची स्थापना केली, केशवपनास विरोध केला, पुनर्विवाह घडवून आणले, दुष्काळात अन्नछत्र उघडले, 'सत्यशोधक समाजा'ची स्थापना केली, 'सार्वजनिक सत्यधर्मा' ची स्थापना केली. थोडक्यात, त्यांनी दीनदुबळ्या, तळागाळातल्या शोषित वर्गाचाच विचार करून आपले आयुष्य त्यांच्या उन्नतीसाठी खर्च केले. त्यांनी आपल्या प्रत्येक विचाराला कृतीची जोड दिली.

### ४. बंडखोर व्यक्तिमत्त्व :

तात्यांनी प्रस्थापित समाजव्यवस्थेला विरोध केला आणि समाजात रूढ असलेल्या प्रथा, परंपरा आणि सामाजिक प्रश्न त्यांच्याविषयी म्हणजेच एकूणच परंपरेला छेद देणारे अमूलाग्र बदल घडवून आणले आणि तेही पुण्यासारख्या सनातन्यांच्या शहरात. येथेच त्यांच्या बंडखोरपणाचे मूळ दिसून येते. सामान्य परिस्थिती असलेल्या माळी कुटुंबात तात्यांवर प्रथमपासून बंडखोर व्यक्तींच्या विचारांचा प्रभाव होता. त्यामुळे कोणतेही कार्य ते निर्भीडपणे करीत. वैचारिक आणि सामाजिक क्रांती करावयाची असेल, तर बंडखोरच व्यक्तिमत्त्व आवश्यक असते. बंडखोर लेखक म्हणून, बंडखोर कवी म्हणून, बंडखोर कार्यकर्ता म्हणून त्यांचा उल्लेख करता येईल. भोवतालच्या समाजात येणाऱ्या अनुभवातूनच त्यांचे व्यक्तिमत्त्व घडत होते. त्यात इंग्रज परकीय असले, तरी त्यांनी शिक्षणाला दिलेली सार्वत्रिकता, मिशनरी लोकांचीही समाजजागृतीची कामे ह्यामुळे ते विचारमग्न होत व आपल्या समाजात काय चालले, ह्याचा विचार करीत. अजूनही शिवाशीव, स्पृश्य-अस्पृश्यता मानली जाते, हे त्यांच्या लक्षात आले होते. म्हणूनच त्यांनी आपले विचार सडेतोडपणे मांडण्यास सुरूवात केली होती. सडेतोडपणाचेच त्यांचे लेखनही होते. स्त्रिया, दलित आणि शेतकरी ह्यांची दुःखे त्यांना कळून आली होती. तत्कालीन सामाजिक जीवनाचे, त्यातील धार्मिक वर्चस्वाचे दांभिक रूप त्यांनी

आपल्या लेखणीतून व वाणीतून जगासमोर उघड केले. ज्यावेळेस स्त्री माजघरातूनही बाहेर पडत नव्हती, त्यावेळेस त्यांनी स्वतःच्या पत्नीस शिकवून मुलींच्या विकासासाठी शिक्षिका म्हणून उभे केले. बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना हे त्यांचे कृत्य त्यांच्या बंडखोर व्यक्तिमत्त्वाचे द्योतक आहे. त्यांनी सामाजिक रूढींशी, दोन हात करून आपले लेखन केले. समकालीन वास्तवतेचे भान ठेवून त्यांनी केलेला हा सर्व बंडखोरपणा लक्षणीय म्हणावा लागेल.

**५. संवेदनशील व्यक्तिमत्त्व :**

'महात्मा' म्हणजेच जोतिराव फुले ऊर्फ सर्वांचेच जिवाभावाचे तात्या प्रसंगी हळवे, संवेदनशील होत. ते मूळचे करारी, रागीट स्वभावाचे होते. ज्यावेळी त्यांची लाडकी यमू (अनाथ आश्रमतील मुलगी) त्यांना सोडून गेली, त्यावेळी ते खूप रडले. आपला मित्र सदाशिवराव ह्यांच्या आठवणीने तर त्यांना दाटून आले. वडील दादा, वडलांची मावसबहीण आऊ, थोरले बंधू राजारामभाऊ ह्यांच्या निधनाप्रसंगी, तसेच त्यांच्या स्वतःच्या सत्कार कार्यक्रमाप्रसंगी दादांची त्यांना झालेली आठवण अशा अनेक वेळी तात्या आपले दुःख आवरू शकले नाहीत, इतके ते संवेदनशील होते.

**६. उद्योगशीलता :**

तात्यांनी आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी स्वतःचे दुकान टाकले होते. त्यांनी अनाथ स्त्रिया व अनाथ मुले ह्यांना आपल्या घरातच आश्रय दिला होता. त्यांचा सर्व खर्च तात्यांनाच करावा लागत होता. त्यामुळे तात्या कधीही बसून राहत नसत. त्यांनी आपल्या पत्नीबरोबर गोधडी शिवण्याचेदेखील काम केले. कोणत्याही कामाची ते लाज बाळगत नव्हते. काम करत असताना अगदी मनापासून ते काम करीत. शेतातील कामे करण्यासही त्यांना कधी लाज वाटत नव्हती.

ज्यावेळेस तात्या शेतात मोट हाकीत होते, तेव्हा त्यांना पाहून कामकरी हसायला लागले. तेव्हा तात्या म्हणाले, ''अरे हसता काय ? मी शेतकरीच आहे. मोट मी लहाणपणापासून हाकली आहे.''[६] त्यांनी बांधकामसाहित्य पुरविण्याचे कंत्राट घेतले, त्यावेळी पण ते स्वत: तेथे जाऊन दगड उचलत असत. नगरपालिकेतील कामातही त्यांनी गरीब जनतेच्या हिताची अनेक कामे केली होती.

**७. राष्ट्राभिमान :**

तात्यांना प्रथमपासून राष्ट्रपुरुष छ. शिवाजीराजांविषयी अभिमान वाटत होता. त्यांनी त्यांचे चरित्र वाचले होते. शिवाजीराजांनी केलेल्या कार्याने ते प्रेरित झाले होते. त्यांना त्यातून एक वेगळीच प्रेरणा मिळत होती. म्हणूनच त्यांनी प्रथम शिवाजीराजांच्या समाधीचा शोध लावला व शिवाजीराजांवर पोवाडा लिहिला, कोल्हापूरच्या खटल्याच्या वेळीही त्यांनी 'दीनबंधू' ह्या वृत्तपत्रातून सडेतोड लिखाण केले. त्यामधूनही त्यांचा राष्ट्राभिमान दिसून येतो.

**८. कुशल राजकारणी :**

नगरपिते म्हणून निवडून आल्यावर तात्यांनी प्रथम दारुचे गुत्ते जे पुण्यात रस्तोरस्ती फोफावले होते, ते बंद केले. अनाचाराला थारा दिला नाही, गोरगरीब लोक संसाराला लावले, भाजीमंडईचा प्रश्न मिटवला, गरीब भाजीविक्रेत्यांसाठी भाडे कमी केले.

अशा प्रकारे ह्या आठ पैलूंमधून म. फुले ऊर्फ तात्या ह्यांचे व्यक्तिमत्त्व कादंबरीकाराने साकार केले आहे.

**(आ) सावित्रीबाई फुले ऊर्फ काकू :**

दुसरी प्रमुख व्यक्तिरेखा म्हणजे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले होय. त्यांची व्यक्तिरेखा आपल्यासमोर येते ती जोतीराव फुले ह्यांच्या सहधर्मचारिणीच्या रूपात, एका

सोशिक व विचारप्रवर्तक स्त्रीच्या स्वरूपात. त्यांचे संपूर्ण जीवन हे सामाजिक कार्यानेच भरून गेलेले आढळते. वयाच्या नवव्या वर्षी जोतीरावांच्या आयुष्यात त्या आल्या. त्यांच्या कर्तृत्वाची ज्योत प्रज्वलित करीत त्यांच्या प्रत्येक कार्यात आपला हातभार लावणाऱ्या, हे कार्य सिध्दीस नेणाऱ्या व स्त्रीसुध्दा पुरुषाच्या बरोबरीने युगप्रवर्तक कार्य करू शकते, हे जगाला दाखवून देणाऱ्या त्या आद्य शिक्षिका होत.

एकोणिसाव्या शतकात पशुपेक्षाही हीन अशी वागणूक स्त्रिया आणि शूद्र ह्यांना मिळत होती. रुढी, परंपरा व अंधश्रध्दा ह्यांच्या गुलामगिरीत गटांगळ्या खात जगणारा समाज स्त्रीला कमी लेखत होता. स्त्रीने शिकणे म्हणजे महापापच समजले जात होते. तरीही निरक्षर असलेल्या त्या क्रांतिज्योतीने आवश्यक तेवढे शिक्षण घेतले, तेही विवाहानंतर. त्यांना आधार होता त्यांचे पती जोतीराव फुले ह्यांचा. त्यांच्यामुळे, त्याचबरोबर स्वयंप्रेरणेने, तसेच स्वत:च्या अखंड कार्यकर्तृत्वाने त्या आद्यशिक्षिका, मुख्याध्यापिका, समाजसेविका, दीनदलितांच्या उध्दारक, आधुनिक मराठी कवितेच्या गंगोत्री, सत्यशोधक समाजाच्या नेतृत्व सांभाळणाऱ्या अशा वेगवेगळ्या भूमिका पार पाडू शकल्या. जोतिबा फुले ह्यांनी केलेल्या सामाजिक सांस्कृतिक कार्यात सावित्रीबाईंचा सिंहाचा वाटा आहे. महाराष्ट्राच्या स्त्रीजीवनाला आकार देणारी एक रचनात्मक शक्ती म्हणून सावित्रीबाई फुले ह्यांचा अभिमानाने उल्लेख करता येतो. पुराणकाळातील सावित्री पतीचे प्राण परत मिळविण्यासाठी मृत्यूबरोबर झगडली. पण आधुनिक काळातील ही सावित्री मृतवत झालेल्या समाजात आणि स्त्रीच्या जीवनात नवा प्राणा ओतण्यासाठी एकोणिसाव्या शतकात अखंड संघर्ष करीत राहिली. तिच्या लढ्याची स्फूर्तिदायक गाथा समजून घेण्यासाठी त्या कालखंडातील सामाजिक स्थितीचे चित्र पाहणे उपयुक्त ठरेल.

'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' असे मनूने स्त्रीच्या पारतंत्र्यावर कायमचे शिक्कामोर्तब करून ठेवले होते. घराच्या चार भिंतीत कोंडल्या गेलेल्या स्त्रीला ज्ञानाचा अधिकार, स्वातंत्र्य

ह्यापासून अनेक शतके वंचित ठेवण्यात आले होते. तिचा नखही समाजाच्या दृष्टीस कधी पडत नव्हता. दयनीय अवस्थेत जगत असलेल्या ह्या स्त्रीला मुक्त करण्यासाठी शेकडो वर्षांच्या परंपरेच्या विरोधात जाऊन स्त्रियांच्या अधिकारासाठी लढणारा महामानव, स्त्री, शूद्र, अतिशूद्र ह्यांच्या शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी महाराष्ट्राच्या तपोभूमीत शिक्षण संस्थांचे जाळे निर्माण करणारा कुशल कार्यकर्ता म्हणजे जोतिबा फुले होय.

क्रांतिज्योती सावित्री ह्याही सर्वसामान्य स्त्रीप्रमाणेच जन्मल्या, वाढल्या व नवव्या वर्षातच त्यांनी जोतिबांच्या घरात पदार्पण केले. त्यांची ज्ञानज्योत पेटली ती जोतिरावांच्या घरात आल्यावरच. हीच सामान्य गृहिणी पुढे क्रांतियुगाचा आरंभ करून चिरंतन झाली. सावित्री फुले ह्यांचा काळ दीडशे वर्षांपूर्वीचा असून त्या काळात भारतीय समाजव्यवस्थेत भिन्नभिन्न कल्पना रूढ होत्या. एकूणच स्त्रीला कोणत्याच क्षेत्रात स्वातंत्र्य नव्हते. अशा काळात जोतिरावांनी अतिशूद्रांना व स्त्रियांना शिकविण्याचे ठरविले. तेवढ्यात सावित्री त्यांच्यासमोर आली होती. जोतिराव आपले विचार पुढीलप्रमाणे सावित्रीसमोर बोलून दाखवतात, ''यावर एकच इलाज आहे आणि तो म्हणजे शिक्षण. शिक्षणच आम्हाला तारू शकेल. नुसतं पुरुषांनी शिकून चालणार नाही. स्त्रियांनीही शिकलं पाहिजे. स्त्रीशिक्षण आणि स्त्रीसुधारणा हाच समाजाच्या सुधारणेचा पाया आहे. अतिशूद्र स्त्रियांच्या शिक्षणापासून या कामाला सुरूवात केली पाहिजे.''[७]

''सावित्री, तू लिहा-वाचायला शिकशील ?''[८]

सावित्रीला सर्वांचाच विचार करावयाचा होता. सासरे गोविंदराव काय म्हणतील, हेही तिला बघावे लागणार होते. परंतु जोतिरावांना लगेच निर्णय हवा होता. त्यामुळे त्या लगेच वाचण्यास तयार झाल्या. सावित्रीबाईंचा होकार कळताच जोती आनंदून गेले. सावित्रीविषयीच्या अभिमानाने त्यांचे डोळे चमकले. शेतातील मातीची पाटी केली. धूळपाटीवर झाडीच्या फांदीने अक्षरे गिरविण्यास आरंभ केला. सावित्रीबाई व आऊ

जोतिरावांच्या विद्यार्थिनी झाल्या. हळूहळू अक्षरे काढता येऊ लागली. त्यांची जिद्द व कष्ट करण्याची तयारी ह्यामुळे त्यांनी लगेचच प्रगती केली. शेतातील पिकांची नावे लिहून झाली. फुलझाडांची नावे लिहिता येऊ लागली. वजाबाकी, बेरीज ह्याचेही जोतिरावांनी सावित्रीला ज्ञान दिले. अशा प्रकारे जोतिरावांनी पहिली शिक्षिका तयार केली. सावित्रीबाईंनी धाडसाने शिक्षिका म्हणून काम करण्यास सुरूवात केली. ऐन तारुण्यात पुण्यासारख्या सनातन्यांच्य माहेरघरात अनेक संकटांना तोंड देत सत्य, समता आणि मानवता ह्यांसाठी जोतिरावांच्या क्रांतिकार्यात सहभागी होऊन त्यांनी स्त्रियांच्या उध्दाराचे कार्य हाती घेतले. महात्मा जोतिराव फुले हे युगपुरुष ठरले, तर सावित्रीबाई फुले ह्या युगस्त्री ठरल्या. सत्य, समता आणि मानवतावाद ह्यासाठी त्यांनी आपले आयुष्य वेचले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे काही महत्त्वाचे पैलू असे :

**<u>१. आदर्श गृहिणी</u> :**

सावित्राबाईंनी म्हणजेच काकूंनी आपल्या आयुष्यात विविध जबाबदाऱ्या पार पाडल्या. पती जर समाजसुधारक असेल; तर पत्नीही तशीच कर्तृत्ववान, सहनशील, समजूतदार, संयमी, मनमिळाऊ असावी लागते. जोतिराव जसे धडाडीने, धाडसाने, शौर्याने, तत्त्वनिष्ठिने कार्य करीत होते, तशाच सावित्रीबाई ह्याही कार्य करीत होत्या. म. फुले ह्यांना भेटावयास अनेक लोक येत असत. त्यात सामान्य माणसे, कार्यकर्ते, हितचिंतक, मित्र, ख्रिस्ती मिशनरी, इंग्रज सरकारचे अधिकारी, सयाजीराव महाराज आणि मामा परमानंद ह्यांच्यासारखे राजर्षी आणि महर्षी व्यक्तीसुध्दा येत असत. त्या सर्वांचे उचित असे आगत-स्वागत त्या करीत. त्यांच्या घरी आलेली कोणतीही व्यक्ती कधी उपाशी परत गेली नाही. दुष्काळ पडला असताना म. फुले ह्यांनी अन्नछत्र उघडले होते. त्या अन्नछत्रात सावित्राबाई भाकरी करण्यास जात असत आणि म. फुले ह्यांनीही त्यांना त्या गोष्टीस कधी विरोध केला

नाही. उलट काकूंनी एखाद्या भिकाऱ्याला धान्य दिले, तर ते धान्य नेण्यासाठी, बांधण्यासाठी तात्या त्याला आपल्या खांद्यावरचे उपरणेसुध्दा देत. दुष्काळाने पछाडलेल्या गोरगरिबांना, शेजारच्या गरिबांच्या मुलांना काकू आवडीने जेवायला घालीत. तात्यांपेक्षाही काकूच ह्याबाबतीत दोन पावले पुढे असत. कधी त्यांना तात्या म्हणत,

"सावित्रीबाई इतका खर्च करू नये."

त्यावर हसून काकू म्हणत,

"शेटजी, काय बरोबर न्यायचं आहे ?"[१]

ह्यातून त्यांची परोपकारी वृत्ती दिसून येते. त्यांना स्वत:चे मूलबाळ नव्हते. पण त्या दु:खाने कधी व्याकूळ झाल्या नाहीत. पोरकी, निराश्रित अर्भके हीच त्यांना आपली मुले मानली होती.

तात्यांना आयुष्याच्या शेवटपर्यंत सावित्रीबाई ह्यांनी साथ दिली. तात्यांचे हाल, दु:ख त्यांनी स्वत:च्या शिरावर घेतले. त्यांनी तात्यांना वेळोवेळी सुखाचा, आनंदाचा, प्रीतीचा, औदार्याचा हात दिला. जगातील त्यांचा एकुलता एक मित्र व त्यांना अखेरपर्यंत साथ देणारी विभुती म्हणजे त्यांची पत्नी सावित्रीबाई हीच होती. ती वीरपत्नी होती, सत्यवती होती. जोतिबांचे सारे तेज, सारे धैर्य आणि कर्तृत्व ह्या साध्वीच्या तपामुळे खरेखुरे चमकले. जोतिबांना ह्या माउलीने एका शब्दानेही कधी न दुखावता त्यांना परोपरीने प्रत्येक कार्यात मदत केली. संसाराचा भार सांभाळण्यासाठी त्यांनी गोधडीसुध्दा शिवल्या. पतीबरोबर प्रत्येक कार्यात त्यांनी स्वत:ला वाहून घेतले. सावित्रीबाई पूर्णपणे ज्योतिर्मय झाल्या होत्या. म्हणूनच त्या आपल्या एका कवितेत म्हणतात,

"माझ्या जीवनात ज्योतिबा स्वानंद ।

जैसा मकरंद कळीतला ।।"

ज्योतिबांनाही आपल्या पत्नीचा अभिमान होता म्हणूनच त्यांचा ज्यावेळी सत्कार करण्यात आला, तेव्हा त्यांनी तो सत्कार केवळ आपल्या एकट्याचा नसून सावित्रीचाही आहे, असा स्पष्ट उल्लेख केला. दोघांनाही एकमेकांबद्दल अभिमान वाटत होता.

**२. स्त्रियांची उध्दारकर्ती :**

एका शेतकरी व ग्रामीण कुटुंबात जन्मलेल्या सावित्रीबाई पुण्यात भिड्यांच्या वाड्यात पहिली भारतीय शिक्षिका म्हणून काम करू लागल्या. त्यांना शिक्षणाचे महत्त्व समजले होते. कशाचीही पर्वा न करता त्यांनी उपेक्षित जीवन जगणाऱ्यांना शिक्षणाचे महत्त्व लक्षात आणून दिले. विद्या हेच समाजाला जागे करण्याचे साधन आहे, हे त्यांना चांगले उमजले होते. महिलांना तर त्याची फार गरज आहे, हे सावित्रीबाईंनी ओळखले होते. त्याकाळी समाजात चालू असलेल्या प्रथेला विरोध करून स्त्रियांवरील अन्यायाविरुध्द त्यांनी आवाज उठविला होता. स्त्रियांचे रात्रीचे वर्ग त्यांनी घेण्यास त्यांनी सुरूवात केली. बालविवाहामुळे येणारे वैधव्य कपाळी घेऊन व पुरुषांच्या वासनेची शिकार होऊन समाजात वावरणाऱ्या ज्या विधवा स्त्रिया होत्या, त्यांना कोठेच आश्रय मिळत नव्हता. नदीत किंवा विहिरीतच त्यांना आपला जीव द्यावा लागे. अशा स्त्रियांसाठी सावित्रीबाईंनी प्रतिबंधक गृहाची स्थापना केली. त्यांनी आपल्या स्वत:च्या घराचे दरवाजे त्यांच्यासाठी व त्यांच्या बाळांसाठी सदैव उघडे ठेवले. त्यामुळे स्त्रिया आपला जीव देण्याऐवजी बाळाला जन्म देऊ लागल्या. आश्रमात दिवसेंदिवस संख्या वाढू लागली. कारण तेथे त्यांना आईसारखी स्त्री नव्हे, तर प्रत्यक्ष आईच मिळाली होती. शांताराम, लक्ष्मी, यमू अशी मुले अनाथ आश्रमात येऊ लागली. गोदाबाईसारख्या अनेक स्त्रिया आपल्या जीवनाला कंटाळून

आत्महत्या करणार होत्या. त्या बचावल्या. तात्यांना त्यांच्या लिखाणातून व कंत्राटाच्या कामातून वेळ मिळत नव्हता. पण तो भार पूर्णपणे काकू सांभाळत होत्या. स्त्रियांच्या दु:खाशी त्या समरस झाल्या होत्या. यशवंताची आई काशीबाई ही क्षयाने आजारी असताना मुलाला पाहण्यासाठी रात्री-अपरात्री येत असे. सावित्रीबाईंना ती कधी येणार, हे जणू माहीतच असे. त्या तिच्यासाठी कधीही दार उघडत असत. कोणत्याही धोक्याचा विचार त्या करत नसत व तात्यांनाही सांगत नसत. त्यावर तात्यांनी विचारले, तर म्हणत,

"बायकांची दुखणी बायकांनाच कळायची, शेटजी !"[१०]

केशवपन करणाऱ्या न्हाव्यांना त्यांनी संप घडवून आणण्यास प्रवृत्त केले होते. कारण त्यांना ह्या दुष्ट प्रवृत्तीविरुध्द बंड करावयाचे होते व ते त्यांनी घडवूनही आणले. ह्या सर्व कार्यातून स्त्रीसुधारककर्ती अशीच सावित्रीबाईंची प्रतिमा वाचकांसमोर उभी राहते.

## ३. साहित्यनिर्मिती :

सावित्रीबाईंना विलक्षण आत्मविश्वास होता. चैतन्यमय अशा सावित्रीबाई जोतिबांना केवळ साथच देत नव्हत्या, तर धीरही देत होत्या. आपले माहेर नायगाव येथून लिहिलेल्या पत्रातून त्यांचे हे व्यक्तिमत्त्व आपल्यासमोर येते. पत्रात त्या म्हणतात, "......... यावरून तुमच्या ध्यानात येईल की, पुण्यात आपल्याविषयी दुष्टावा माजविणारे विदूषक पुष्कळ आहेत. तसेच येथेही आहेत. त्यांना भिऊन आपण हाती घेतलेले कार्य का सोडून द्यावे ? सदासर्वदा कामात गुंतावे भविष्यात यश आपलेच आहे."[११] त्यांची भाषा अशी धीराची होती, आपुलकीची होती. प्रत्येक गोष्टीचा त्या विचार करीत व मगच त्यावर निर्णय घेत असत. तात्यांच्या नाटकाचे लिखाण पूर्ण झाल्यानंतर तात्यांनी काकूंना विचारले, तेव्हा त्या म्हणाल्या,

''मला विचारत असाल, तर नाटकाला 'तृतीय रत्न' हेच नाव नक्की करा. तुम्हीच तर सांगत असता पृथिव्यांत्तीणि रत्नानि- जलं अन्न सुभाषितम् ।, मुढै पाषाणखण्डेषु रत्नसंज्ञांविधियते ॥''[१२] सावित्रीबाई ह्या फक्त नाटकालाच नावे सुचवित नव्हत्या, तर त्या नेहमी 'गृहिणी' वाचत होत्या, 'गृहिणी'त लिखाण करीत होत्या. 'स्त्रीशिक्षण आणि स्त्रियांचा सामाजिक दर्जा' ह्या विषयावर त्यांनी लेख लिहिले होते. 'काव्यफुले' नावाचा त्यांचा ४० स्फुट रचनांचा संग्रह १८५४ ला प्रकाशित झाला होता. 'बावन्नकशी सुबोध रत्नाकर' ही ९२ कडव्यांची काव्यरचना त्यांनी जोतिबांच्या निधनानंतर १८९१ मध्ये लिहून ती १८९२ मध्ये प्रकाशित केली होती.

## ४. धाडसी व्यक्तिमत्त्व :

सावित्रीबाई ह्या सर्जनशील प्रज्ञेच्या व जनसंस्कृतीच्या समृध्दीशी मुळातच जुळलेल्या होत्या. त्या एक असामान्य असे व्यक्तिमत्त्व लाभलेल्या विभूती होत्या. त्यांच्या रूपाने धैर्यशील, कर्तृत्वसंपन्न अशी जीवनसाथी तात्यांना मिळाली होती. सावित्री व जोतिबा ह्यांना स्वत:ची संतती नसल्यामुळे नवससायास करून संतती मिळविण्यापेक्षा त्यांनी यशवंतालाच आपले मूल म्हणून दत्तक घेतले होते व तोच त्यांचा उत्तराधिकारी होता. जोतिबांची जीवनयात्रा संपली, तेव्हा सावित्रीबाई व यशवंत ह्यांच्यावर फार मोठा आघात झाला. अंतिम संस्कार करण्यावरून त्यांच्या भाऊबंदकीत वाद निर्माण झाला, तेव्हा सावित्रीबाईंनी दाखविलेले धैर्य म्हणजे एक क्रांतीच होती. अजूनही आजच्या समाजात धार्मिक कार्य करण्यास स्त्रियांना परवानगी दिली जात नाही. परंतु सावित्रीबाईंनी दाखविलेले धाडस म्हणजे १५० वर्षांपूर्वीची क्रांतीच होती. त्यांनी आपल्या भाऊजीला कणखरपणे सांगितले, ''भाऊजी, टिटव धरायची काळजी तुम्हाला नको. टिटव मी धरणार आहे. खांदा फक्त सत्यशोधक बांधव देतील. तुमची कोणाचीही सावली शेटजींवर पडायला

नको आहे. इतक्या दिवसानंतर आजच तुम्हाला शेटजींची आठवण का झाली, ते मला माहीत आहे. निदान त्यांनी केलेल्या उपकारांची तरी आठवण ठेवा''[१३]

भारतीय स्त्रीशक्तीचा समर्थ असा आविष्कार सावित्रीबाईंच्या रूपाने आपल्याला पाहावयास मिळतो. आजच्या समाजात ज्या थोड्याबहुत स्त्रिया शिक्षण घेऊन विविध क्षेत्रांमध्ये पुरुषांच्या बरोबरीने काम करतात, त्या सर्व स्त्रिया सावित्रीबाईंच्या ऋणी आहेत.

## ४.३ तात्यांचे आप्तस्वकीय :

तात्यांच्या आप्तस्वकीयांमध्ये आऊ, दादा, राजारामभाऊ ह्यांचा अंतर्भाव होतो. म. फुले नऊ महिन्याचे असतानाच मातृसुखास पारखे झाले होते. त्यांचे वडील गोविंदराव ह्यांनी दुसरे लग्न केले. परंतु म. फुल्यांचा सांभाळ आऊंनी म्हणजे त्यांच्या मावसबहिणीने केला. सगुणाबाई म्हणजेच आऊ ह्या फुले दांपत्याच्या जीवनात एक मध्यबिंदू होत्या. सगुणाआऊला त्याच्या कुटुंबात मानाचे स्थान होते. त्या स्वत: विधवा होत्या. जोतीचा सांभाळ करीत असतानाच त्या मिशनऱ्याचे काम करणारे मिस्टर जॉन व मेरी जॉन ह्यांचा मि. जेम्स् नावाचा जो मुलगा जोतीच्याच वयाचा होता, त्याचा सांभाळ करण्याचे काम करीत होत्या. मिस्टर जॉनच्या घरात त्या सतत वावरत असल्यामुळे त्यांना शिक्षणाचे महत्त्व कळले होते. म्हणूनच त्या म्हणतात, ''विद्या घेणं आणि विद्या देनं, हे पुण्याचं काम हाय. बामनी कावा जोतीनं वळखला, तसा आपुनबी वळखायला पाहिजे. तू ज्या क्रिश्नाजी कारकुनाच्या सांगण्यावरून जोतीची शाळा थांबावलीस, तो त्यांचा कावाच हुता, नव्हं का? तुझा पोरगा शिकला असता, तर त्याला हिसाबात घसके कसे मारता आले असते ? तवा त्यानं भरवलं तुझ्या मनात पोरगा कशाला शिकवतोस म्हणून.''[१४]

आऊला समाजातील वास्तव जीवनाचे सखोल ज्ञान झालेले होते. ब्राह्मणी लोकांचा कावा तिच्या चांगलाच लक्षात आलेला होता. वर्चस्व प्रस्थापित झालेले हे लोक शूद्र-अतिशूद्रांना शिक्षण का घेऊ देत नाहीत, हे तिला कळत होते. म्हणूनच जोतीने विद्या घेणे आणि विद्या देण, हे तिला पाप वाटत नव्हते. तत्कालीन रुढी अशी होती की, फक्त ब्राह्मणांनीच विद्या घ्यावी किंवा द्यावी. कारण ते पुण्याचे काम करण्याचा हक्क फक्त त्यांनाच होता. शूद्रांनी ते केले, तर ते पाप समजले जात होते. गोविंदरावांचीही हीच धारणा होती. जोतिबा आपल्या पत्नीस-सावित्रीबाईस शिकविण्यास सुरूवात करतात. कारण त्यांना स्त्रीजीवनात क्रांती करावयाची होती, शिक्षणाचे महत्त्व एका स्त्रीकडूनच सर्वांना सांगावयाचे होते. पण दादा म्हणतात, ''शिकून तो शाना झाला. तेवढं लई झालं की ! आता त्या पोरीला कशाला शिकीवतोय ? का तिलाबी पाठविणार हाय शाळेत मडमीन करून ?''

त्यावर आऊ म्हणते, ''दादा, तू तरास करून घेऊ नको. जोती कायबी चुकीचं करणार न्हाई.''[१५]

एवढा विश्वास आऊला जोतीबद्दल होता. स्त्रीशिक्षणाचे महत्त्व आऊलाही समजले होते. म्हणून आऊच सावित्रीस शिकविण्यास सांगते आणि स्वत:ही तात्याची विद्यार्थिनी होते. जोतिरावांच्या शिक्षणकार्यास ती मदत करीत असते. १५ मे १८४८ रोजी पुण्यात महारवाड्यात मुलांमुलींसाठी शाळा सुरू करण्यात आली, तेव्हा त्या शाळेवर सगुणाबाई ऊर्फ आऊ ह्यांनी विनावेतन काम केले. सगुणाआऊ कष्टाळू होत्या. त्यांनी मिस्टर जॉनच्या घरातील काम करून जो काही नोकरीचा मिळालेला पैसा होता, तो जोतिरावांच्या शिक्षणकार्यास हातभार म्हणून दिला होता. सगुणाआऊलाही मूलबाळ नव्हते. जोतिराव व सावित्रीबाई ह्यांच्यावरच त्या मुलाप्रमाणे प्रेम करीत असत. शिक्षणाचे सर्व संस्कार त्यांच्यावर मिस्टर जॉनच्या घरातील झाले होते. त्यांच्या घरात त्या सतत वावरत

असल्यामुळे त्या अडाणी असूनही इंग्रजी बोलत असत. जोतिबाबद्दल त्यांच्या खूप अपेक्षा होत्या. त्याने खूप शिकावे व समाजसेवेचे काम करावे, अशी त्यांची इच्छा होती.

जोतिबा नऊ महिन्याचे होते, त्यावेळेस तर त्यांनी जोतिबाला सांभाळलेच. परंतु जेव्हा दादांनी जोतिबांना घर सोडण्यास भाग पाडले, त्यावेळेसही त्यांनी जोतिरावांना सतत मदत केली. दादा व जोतिबा ह्यांच्यात जेव्हा अबोला होता, त्यावेळेसही त्यांनी दोघांची समजूत काढली होती. दोघांनाही त्या आपल्यापरीने समजून घेत होत्या. तरीही दादा तिच्यावर रागवत असत आणि तिलाच बोल लावत. जोतीच्या भाऊबंदकीतील लोक जेव्हा ब्राह्मणाच्या सांगण्यावरून घरी आले व दादांना वाळीत टाकण्याची भाषा बोलू लागले, तेव्हा इतके दिवस आऊमुळे गप्प बसलेले दादा चिडले. त्यातून जोतिबा व दादा ह्यांचे भांडण जुंपले. आऊंनी त्यांना समजविण्याचा खूप प्रयत्न केला. पण काहीही उपयोग झाला नाही. जोतीनेही घर सोडण्याचा निर्णय घेतला. आऊची स्थिती मात्र खूप अवघडल्यासारखी झाली. त्यांना जोतीच्या डोळ्यातला भाव समजत होता. घर सोडून गेला, तरी त्यांचे नाते मात्र कायमस्वरूपी होते. म्हणूनच आऊ जोतीकडे सतत जात-येत असे. जोतीचा आणि सावित्रीबाईंचा सत्कार करण्यात आला, त्यावेळेस आऊ सोबत होत्या. आऊमुळेच जोतीला 'जोतिराव फुले' म्हणून लोक ओळखू लागले होते. आऊच त्यांची प्रेरणा होती. आऊंनी त्यांचे अभिनंदन केले, आईप्रमाणे आपल्या मुलांच्या तोंडावरून हात फिरवून त्यांचे गोड कौतुक केले. जोतीला आऊबद्दल सतत अभिमान वाटत राहिला. म्हणूनच सावित्रीबाईंना आऊ सतत आठवत राहिली.

दादा म्हणजे तात्यांचे वडील. जुन्या परंपरेत आपले आयुष्य वेचलेले दादा परंपरावादी विचारसरणीचे होते. तत्कालीन परिस्थितीचा जबरदस्त पगडा त्यांच्या मनावर होता. ह्या पार्श्वभूमीवर ते आपल्या मुलाला वाढवित होते. त्याला शिक्षण देण्याचे त्यांचे मोठे धाडसाचे कार्य होते. कारण ते माळी समाजाचे होते. माळी समाजातील मुलांना

शिक्षण घेण्यास बंदी होती. फक्त ब्राह्मणांनाच शिक्षण मिळत होते. गोविंदराव फुले ह्यांनी म्हणजे तात्यांच्या वडिलांनी मात्र तात्यांना शिकविले. तात्यांना इंग्रजी शिक्षण घ्यावयाचे होते. परंतु दादांना एका भटाने सांगितले की, इंग्रजी शिक्षण शिकवण्यापेक्षा पोराला शेतात काम करण्यास पाठवा. दादांच्या लक्षात त्याचा कावेबाजपणा आला नव्हता. परंतु आऊने जेव्हा दादांना शिक्षणाचे महत्त्व सांगितले, तेव्हा त्यांनी जोतीला इंग्रजी शाळेत घातले. आऊमुळेच जोतिरावांना पुढचे शिक्षण घेता आले. परंतु जेव्हा जोतीने सावित्रीबाईंना शिकविण्यास सुरूवात केली, तेव्हा मात्र दादा खूप चिडले. ते स्फोट झाल्याप्रमाणे तात्यांना बोलले,

''बायकांनी लिवायला शिकनं धर्माच्या इरूध्द हाय. तू देवाधर्माच्या इरूध्द का जातोस ?''[१६] दादा हे केवळ स्वतःच्या मनाचे बोलत नव्हते, तर त्यांना ब्रह्मवृंदाने भरीस घातले होते. शेवटी तात्यांनी घर सोडले. परंतु ते नेहमी दादांना भेटण्यास येत असत. तात्यांचे मूल पाहण्याची दादांची इच्छा होती. परंतु ती इच्छा पूर्ण होऊ शकली नाही. त्यात तात्यांनी बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केल्यामुळे तर दादांनी जास्तच हाय खाल्ली. त्यामुळे त्यांची तब्बेत घसरत चालली. शेवटच्या क्षणी दादांनी तात्यांना भेटण्यास बोलविले. दादांना तात्यांच्या कार्याबद्दल कौतुकच होते. परंतु ते जुन्या विचारसरणीचे असल्यामुळे त्यांचा समाजापुढे काही इलाज चालत नव्हता.

तात्यांचे थोरले बंधू राजारामभाऊ ह्यांचा 'महात्मा' ह्या कादंबरीत जास्त उल्लेख पाहावयास मिळत नाही. कारण तात्यांचा आणि त्यांचा जास्त सहवास नव्हता. ते दुष्काळ पडल्यानंतर मुंबईला काही दिवस गेले होते. त्याठिकाणचे हवामान त्यांना सहन न झाल्यामुळे त्यांचा तिथेच मृत्यू झाला. दादांच्या विचारातच ते वाढलेले होते. त्यामुळे सहाजिकच ते त्यांच्याच विचारसरणीचे होते. तात्यांच्या कार्याविषयी त्यांनी कधी आपुलकीने चौकशी केली नाही किंवा कुठे जास्त विरोधही केला नाही. तात्यांना मात्र

राजारामभाऊंविषयी प्रेम होते. त्यामुळेच त्यांनी भाऊंची मुलगी व तिचा नवरा ह्यांच्याकडेच आपली जमीन सोपविली होती.

तात्यांच्या इतर आप्तस्वकीयांमध्ये त्यांची सावत्र आई चिमणाबाई, सदुभाऊ (सावित्रीबाईंचा भाऊ), सहादू वाघोले (राजारामभाऊंचे जावई), गणपती व गजानन (राजारामभाऊंचा मुलगा व नातू), तसेच कृष्णाजी फुले, राणोजी फुले, बाबाजी फुले, महादबा, सदबा फुले ही फुले मंडळी होत. त्यातील काही मंडळींनी म. फुल्यांना त्यांच्या कार्यात मदत केली, काहींनी शेवटपर्यंत विरोध केला.

## ४.४ तात्यांचे मित्र / सहकारी :

मोरो विठ्ठल वाळवेकर, सदाशिव बल्लाळ गोवंडे, सखाराम यशवंत परांजपे, वासुदेव बाबाजी नवरंगे, उस्मान शेख हे तात्यांचे मित्र / सहकारी होत. त्यांना समाजाला शिक्षण देणे महत्त्वाचे वाटत होते. त्यामुळे ह्या सर्वांनी मिळून शाळा सुरू करण्याचे ठरविले. त्यासाठी सर्वांनी मिळूनच प्रयत्न केले. टॉमस पेनचे विचार तात्यांच्या मनात आले ते वासुदेव नवरंग ह्यांनी पाठविलेल्या पुस्तकामुळेच. तात्यांच्या सर्व मित्रांनी मिळूनच लहुजी उस्तादाच्या तालमीत इंग्रजीविरूध्द लढा देण्याचे ठरविले होते. परंतु पूर्वीचेच जुलमी पेशवे सरकार परत सत्तेवर आणण्यापेक्षा समाजक्रांती करावी व समाजातील अज्ञानी लोकांची अक्षरशत्रूपासून सुटका करावी, त्यांना अक्षरांची ओळख करून द्यावी, असे त्यांनी ठरविले. म्हणून त्यांनी आपल्या आयुष्यात प्रथम शिक्षणालाच महत्त्व दिले. सखाराम परांजपे ह्या मित्राच्या भावाच्या लग्नातच तात्यांचा अपमान झाला व त्यामळेच त्यांच्या कार्याची दिशा त्यांना सापडली. ह्या परांजप्यांनी शाळा काढण्यासाठी विद्यार्थ्यांना पाट्या आणून देण्यापासून मदत केली होती. तात्यांच्या प्रत्येक कार्यात तात्यांच्या मित्रांनी एकमेकांना मदत केली होती. परंतु शिक्षण कोणत्या पध्दतीने द्यावयाचे, ह्यावरून त्यांच्यात वाद निर्माण झाला. हा वाद

काही दिवसच टिकला. मैत्रीचे नाते मात्र शेवटपर्यंत टिकून राहिले. म्हणूनच मित्रांच्या मृत्यूनंतर तात्यांना आपल्या अश्रूंना आवर घालता आला नाही.

ज्यांनी आपल्या घासातला घास तात्यांना कठीण प्रसंगी चारला, असे अनेक मित्र तात्यांना लाभले. उस्मान शेख व गफुरचाचा हे त्यापैकी होत. त्यांनी तात्यांना त्यांच्या कार्यात सतत मदत केली. स्वत:चे घर त्यांनी तात्यांना दिले. तात्यांना जेव्हा स्वत:चे घर परके झाले, तेव्हा त्यांनीच तात्यांना जवळ केले व सहकार्याचा हात दिला. उस्ताद लहुजीबुवा साळवे ह्यांनी तालमीत तात्यांना व तात्यांच्या मित्रांना लष्करी शिक्षण दिले होते व सर्व आखाडी खेळ स्वत: जातीने लक्ष देऊन शिकविले होते. त्यांना शिक्षणाचे महत्त्व समजले होते. म्हणूनच त्यांनी विद्यार्थ्यांची कमतरता भासू लागली, तेव्हा महारामांगांच्या घरी जाऊन त्यांना खेकसून शाळेत पाठविले.

तात्यांच्या कार्याची खरी कळकळ-तळमळ जुन्या विचारसरणीच्या लोकांना नव्हती. त्यांनी तात्यांचा शेवट करण्यासाठी दोन मारेकरी पाठविले. धोंडिराम रोडे व धोंडिराम कुंभार हे ते दोन मारेकरी. परंतु त्यातीलच एक मारेकरी धोंडिराम कुंभार अंगरक्षक बनला व नेहमी त्यांच्याच सहवासात राहिला. दुसरा धोंडिराम रोडे पुढे धोंडिरामशास्त्री झाला. शाहिरी करत असताना ब्राह्मणांचा कावेबाजपणा त्या धोंडिरामच्या लक्षात आला व त्याने स्वत:च पंडिती शिक्षण घेण्याचे ठरविले व तो काशीला रवाना झाला. तात्यांमुळेच ह्या धोंडिरामचा पंडित धोंडिरामशास्त्री झाला. ब्राह्मणी वर्चस्व असलेली पंडिती पदवी धोंडिरामशास्त्री ह्यांनी संपादन केली व स्वत: काही कवने रचून जनजागृती केली. अशा प्रकारे ह्या दोघांनीही तात्यांना आपआपल्या परीने मदत केली.

## ४.५ अन्य पुरुषव्यक्तिरेखा :

'महात्मा' ह्या कादंबरीत वरीलप्रमाणे सर्व महत्त्वाच्या व्यक्तिरेखा आहेत. परंतु त्याचबरोबर ह्या कादंबरीत आलेल्या इतर पुरुष व्यक्तिरेखांचाही आपल्याला थोडक्यात

विचार करावा लागेल. तात्यांचे आप्तस्वकीय व त्यांचे मित्र / सहकारी अशा पुरुष व्यक्तिरेखा आपण पाहिल्याच. त्याशिवाय इतरही पुरुष व्यक्तिरेखा आहेत. त्या अशा : तात्यासाहेब भिडे ह्यांनी शाळेसाठी आपले राहते घर मोकळे करून दिले होत. भाऊ कोंडाजी पाटील ह्यांनी सर्व शेतकऱ्यांना एकत्र करून सावकारांविरुध्द कढा देण्यास प्रोत्साहन दिले होते. बापूजी हरी शिंदे हे ताराबाई शिंदे ह्यांचे वडील असून ते सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते होते. सीताराम आबाजी आल्हाट ह्यांचा विवाह तात्यांनी सत्यशोधक समाजाच्या पध्दतीनुसार लावून दिला होता. वासुदेव बळवंत फडके म्हणजे राजकीय क्रांती करून इंग्रजी सत्ता धुडकावून लावण्यासाठी धडपडणारा एक सच्चा देशभक्त ज्याने आपल्या पत्नीससुध्दा लष्करी शिक्षण दिले होते. हरी रावजी चिपळूणकर हा सत्यशोधक समाजाचा एक कार्यकर्ता असून तो तात्यांच्या कार्यात नेहमी सहभागी होत असे कृष्णराव भालेकर ह्यांना 'दीनबंधु'कार म्हणून ओळखले जाते. तात्यांची आणि त्यांची ओळख प्रथम झाली ती नाटकाद्वारे. कृष्णराव भालेकर ह्यांनी 'अज्ञानराव भोळे देशमुख' नावाचे एक नाटक लिहिले होते. ते पाहण्यासाठी तात्या भांबुर्ड्याला गेले होते. तेथेच भालेकरांची व तात्यांची ओळख झाली. भालेकरांची धडपड, त्यांचे धाडस, त्यांचा सामाजिक कार्यातील आवेश पाहून तात्यांना त्यावेळी वाटले होते की, हा पुढे नक्कीच एक सामाजिक कार्यकर्ता होणार. कृष्णराव भालेकर ह्यांनी पुढे 'दीनबंधू' हे पत्रक काढले. परंतु त्यामुळे ते आर्थिक संकटात आले. तरीही त्यांनी आपले प्रयत्न सोडले नाहीत. सामाजिक समस्यांवर अधिक प्रकाश पाडण्याचे काम त्यांच्या दीनबंधूने केले. सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते असल्यामुळे भालेकरांनी 'दीनबंधू' मधून सत्यशोधक समाजाचाही प्रचार केला.

ह्याशिवाय देवराव ठोसर, तुकाराम हनुमंत पिंजन, डॉ. मरे, मिचेल, रे.जेम्स, सदाशिव हाटे, जगन्नाथ सदाशिवजी, अण्णासाहेब चिपळूणकर, बापूसाहेब भांडे, प्रो. केरो लक्ष्मण छत्रे, दादोबा पांडुरंग तर्खडकर, अण्णासाहेब सहस्त्रबुध्दे, किसो त्रिंबक, धुराजी

अप्पाजी चांभार, गणू शिवाजी मांग, केशवराव भवाळकर, बॅ.राम बाळकृष्ण जयकर, न्या. रानडे, लोकहितवादी, कृष्णशास्त्री चिपळूणकर, रामचंद्रराव धामणकर, कृष्णाजी रामय्या व्यंकय्या अय्यामारू (सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते), डॉ. संतुजी रामजी लाड, तुकाराम तात्या पडवळ, मामा परमानंद, नारायण लोखंडे अशा वेगवेगळ्या क्षेत्रांमधील अनेक व्यक्तिरेखा आपल्यासमोर ह्या कादंबरीतून येतात. त्यांचा कथानकाच्या ओघात आपल्याला परिचय होतो व त्या व्यक्तिश: कशा होत्या, हे कळून येते.

## ४.६ अन्य स्त्रीव्यक्तिरेखा :

ह्या कादंबरीतील एक लक्षणीय स्त्रीव्यक्तिरेखा म्हणजे ताराबाई शिंदे ही होय. इंग्रजांच्या राजवटीत जे सुधारणावादी वातावरण तयार होत गेले, त्या वातावरणामुळे ताराबाई शिंद्यांसारख्या कुशाग्र बुध्दिमत्तेच्या स्त्रिया निर्माण झाल्या. स्त्रीजातीवर होणाऱ्या अन्यायाला त्यांनी आपल्या लिखाणातून वाचा फोडली. समग्र स्त्रीजातीच्या वेदना त्यांनी जनतेसमोर आणल्या. अशा प्रकारचे लिखाण केलेली त्यांची वही तात्यांनी वाचली. त्यामुळे तात्यांना खूप आनंद झाला. 'आता एक स्त्री आपल्या वेदना मांडू लागली. पुढे चालून सर्वच स्त्रिया नक्कीच आपल्या हक्काविषयी जागृत होतील', असे त्यांना मनोमन वाटले. 'स्त्री-पुरुष तुलना' हे ताराबाईंचे पुस्तक प्रकाशित करण्यास तात्यानीच मदत केली.

दुसरी लक्षणीय स्त्रीव्यक्तिरेखा म्हणजे पंडिता रमाबाई ही होय. आर्य महिला समाजाच्या संस्थापिका असलेल्या रमाबाई ह्या एक विद्वान पंडिता होत्या. 'भगवत्‌गीता', 'उपनिषद' हे ग्रंथ त्यांना तोंडपाठ होते. त्यांनी काशी व कलकत्ता येथील विद्वान शास्त्रीपंडितांना वादात हरविले होते व 'पंडिता' ही पदवी मिळविली होती. स्त्रियांच्या सुधारणांविषयी त्यांना तळमळ होती. म्हणूनच त्या तात्यांनाही भेटून गेल्या होत्या. पुराण सांगून त्याच त्या पुराणपरंपरा पंडिता रमाबाईंनी जपल्याने, तात्यांना खटकत होते. त्यात पुन्हा पंडिता रमाबाई ह्यांनी ख्रिस्तीधर्माची दीक्षा घेतली होती.

सरस्वतीबाई गोवंडे ह्या सदाशिवराव गोवंडे ह्यांच्या पत्नी असून काकूंच्या त्या जिवाभावाच्या मैत्रीण होत्या. सरस्वतीबाईंनी काकूंबरोबर त्यांच्या कार्यात सतत मदत केली. सदाशिवराव पाट्यापुस्तके घेत, तर सरस्वतीबाई घरातील खाऊ आणून देत. काकूंची आणि त्यांची मैत्री सर्वांना परिचित होती. दोघींना मिळूनच स्त्रीवर्गात जागृती घडविण्यासाठी महिला मंडळाची स्थापना केली होती. त्या माध्यमातून त्या हळदी-कुंकवाचा कार्यक्रम करून स्त्रियांना एकत्र आणण्याचा प्रयत्न करीत.

उस्मान शेखची बहीण, गफूरचाचाची मुलगी व सावित्रीबाईंची दुसरी मैत्रीण म्हणजे फातिमा बेगम. सावित्रीबाईंना व तात्यांना शिक्षणासारख्या पवित्र कार्यात त्यांनी मदत केली. त्या सावित्रीबाईंच्या सहकारी शिक्षिकाच होत्या. मुस्लीम समाजातील पहिल्या शिक्षिका म्हणून त्यांनाच मान दिला जातो. कादंबरीत काशिबाई नावाच्या दोन व्यक्तिरेखा आलेल्या आहेत. पहिली म्हणजे भ्रूणहत्येच्या आरोपावरून जन्मठेपेची शिक्षा झालेली विधवा असून ती गोवंड्यांच्या वाड्यात घरकाम करीत असे. तिला शिक्षा झालेली वाचूनच तात्यांनी 'बालहत्या प्रतिबंधकगृहा' ची स्थापना केली होती व ताराबाईंनी 'स्त्रीपुरुष तुलना' च्या लेखनास सुरूवात केली होती. काशिबाईची दुसरी व्यक्तिरेखा म्हणजे शिंद्यांच्या वाड्यात राहणारी विधवा की जिला 'यशवंत' झाला व ती त्यास मारून टाकणार होती. परंतु काकूंनी तिला आपल्या घरी आणले व तिच्या मुलास स्वत: दत्तक घेतले. काशिबाईला पुढे क्षय झाला व यशवंतास काकू व तात्या ह्यांच्या हवाली करून तिने अखेर प्राण सोडला. चिमणाबाई ही तात्यांची सावत्र आई. तिने कधी तात्यांच्या कार्याला विरोध केला नाही किंवा तोंडभरून कौतुकही केले नाही.

गंगामाई, रंगुबाई, शिवुबाई ह्या स्त्रियांनी तात्यांच्या वाड्यात काही दिवस घरकाम केले. पैकी गंगामाई ही ब्राह्मण असल्यामुळे एका शूद्राच्या घरी काम केलेले तिच्या नातेवाईकांना आवडले नाही व ते तिला घेऊन परत गेले. तात्यांनी प्रथमत: मुलींसाठी जी

शाळा काढली होती, त्यातील मुक्ता नावाच्या एका मातंग विद्यार्थिनीने अस्पृश्यांच्या वेदना प्रकट करणारा एक निबंध लिहिला, जो मराठीतील पहिला निबंध म्हणून संबोधला जातो. मिसेस फेरार ह्यांनी नगरमध्ये शाळा सुरू केली होती. सौ.इ सी जोन्स ज्यांनी तात्यांच्या शाळेला आश्रय दिला होता, अशा अन्य स्त्री व्यक्तिरेखा ह्या कादंबरीत आपल्याला भेटत राहतात.

## ४.७ समारोप :

कादंबरीत जिवंतपणा येण्यासाठी त्या कादंबरीतील व्यक्तिरेखाटनामध्ये जिवंतपणा यावा लागतो. व्यक्तीच्या मनातील संघर्ष, तिची मानसिकता ह्यांचा अभ्यास करून प्रत्येक व्यक्तिरेखा साकार करावी लागते. 'महात्मा' ह्या कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखा म. फुले ह्यांची असून तिच्या जीवनाचा पूर्ण आलेख ह्या कादंबरीतून आपल्याला पहावयास मिळतो. बालवयापासून म. फुले ह्यांची बनत गेलेली मानसिकता, त्यांच्यावर झालेला अन्याय, त्यांच्यावरील अपमानाचा प्रसंग, त्यातून आकारास येत गेलेले त्यांचे ध्येय, ध्येयाच्या पूर्तीसाठी सोडावे लागलेले घर, परंतु ध्येयपूर्णतेकडेच असलेले लक्ष, त्यांच्या कार्यात इतर सहकारी / मित्रांची मिळालेली मदत हे सर्व कादंबरीकार रवींद्र ठाकूर ह्यांनी ह्या कादंबरीत विलक्षण ताकदीने रेखाटले आहे. 'महात्मा' ही एक चरित्रात्मक कादंबरी असल्यामुळे म. फुल्यांच्या जीवनाविषयीचे व तत्कालीन राजकीय, सामाजिक परिस्थितीविषयीचे आकलन ह्या कादंबरीतून आपल्याला येते. त्यासाठी ह्या कादंबरी अनेक व्यक्तिरेखा कादंबरीकाराने चित्रित केल्या. त्यात म. फुले ऊर्फ तात्या ही सर्वात महत्त्वाची व्यक्तिरेखा असून ती साहजिकच ह्या कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे. तिच्या भोवती म. फुल्यांची पत्नी सावित्रीबाई ऊर्फ काकू, वडील गोविंदराव ऊर्फ दादा, मावसबहीण आऊ, तात्यांचे अन्य आप्तस्वकीय, मित्र / सहकारी, अन्य पुरुष व्यक्तिरेखा, अन्य स्त्रीव्यक्तिरेखा अशा छोट्या-मोठ्या व्यक्तिरेखा कादंबरीकाराने गुंफलेल्या आहेत. त्यामुळे कादंबरीतील नायक म. फुले ऊर्फ

तात्या ह्यांचे जीवनचरित्र उठावदार होण्यास मदत झालेली आहे. शिवाय कादंबरीकार रवींद्र ठाकूर ह्यांचे व्यक्तिरेखाटन कौशल्यही प्रत्ययास येते.

# संदर्भ


१. बापट प्र. वा. व गोडबोले ना.वा., 'मराठी कादंबरी : तंत्र आणि मंत्र', व्हीनस प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती, १९७३, पृ. ११४

२. ठाकूर रवींद्र, 'महात्मा', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, १९९९, पृ. १४१

३. तत्रैव, पृ. १४१

४. तत्रैव, पृ. १८०

५. तत्रैव, पृ. १८०

६. तत्रैव, पृ. ३२८

७. तत्रैव, पृ. ३६

८. तत्रैव, पृ.३६

९. तत्रैव, पृ.२९०

१०. तत्रैव, पृ.२९०

११. तत्रैव, पृ. ११९

१२. तत्रैव, पृ.१०६

१३. तत्रैव, पृ. ४५१

१४. तत्रैव, पृ. ४७

१५. तत्रैव, पृ. ४७

१६. रवींद्र ठाकूर, 'महात्मा', पृ. ४७.